


हैदराबाद : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते संत रामानुजाचार्य यांच्या भव्य स्टॅच्यू ऑफ इक्वॉलिटीचे लोकार्पण शनिवारी करण्यात आले. पंचधातूने बनवलेली ही जगातील दुसरी भव्य मूर्ती आहे. (वृत्त पान २ वर..)

रविवार, ६ फेब्रुवारी २०२२

◆ वर्ष १४ ◆ अंक २००
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

गणेश जयंतीनिमित्त स्वच्छतेबाबत जनजागृती/३
पालीमध्ये शिवसेना-राष्ट्रवादी आमनेसामने/५
आज भारत विरुद्ध वेस्ट इंडिज पहिली वनडे/६

# पुण्यात किरीट सोमय्यांना धक्काबुक्की

## ■ रुग्णालय घोटाळा बाहेर येण्याच्या भीतीने शिवसैनिक सैरभैर

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या जम्बो कोविड रुग्णालयाच्या कामात भ्रष्टाचारासंदर्भात महापालिका आयुक्तांना निवेदन देण्यासाठी पुणे महापालिकेत आलेल्या भाजप नेते किरीट सोमय्या यांच्यावर शिवसैनिकांनी जोरदार हल्ला केला. सुरक्षा रक्षकांनी प्रसंगावधान राखून वेळीच गाडीत बसविले त्यामुळे सोमय्या थोडक्यात बचावले. शिवसैनिकांच्या हल्ल्यानंतर किरीट सोमय्या यांनी स्वतः याची माहिती देत ट्वीट केलेय. ते म्हणाले, माझ्यावर शिवसेनेच्या गुंडांनी पुणे महानगरपालिकेच्या आवारात हल्ला केला आहे.

किरीट सोमय्या सायंकाळी साडे चारच्या सुमारास महापालिकेत आयुक्त विक्रमकुमार यांना निवेदन देण्यासाठी येणार होते याची कुणकुण शिवसैनिकांना लागताच सुमारे १०० शिवसैनिक महापालिकेत काही काळ आधी उपस्थित राहिले. सोमय्या हे नवीन प्रशासकीय इमारतीतील गेटने महापालिकेत येणार असल्याची माहिती शिवसैनिकांना मिळाली. त्यामुळे



शिवसैनिक घोषणाबाजी करत नवीन इमारतीकडे गेले. त्यानंतर सोमय्या यांची गाडी जुन्या इमारतीच्या दिशेने आली.

या वेळी आक्रमक झालेले शिवसैनिक सोमय्या यांच्यावर तुटून पडले. हल्ला होण्याची शक्यता लक्षात घेताच सुरक्षारक्षकांनी सोमय्यांना गाडीत बसविले. घोषणाबाजी व धक्काबुक्कीमुळे या ठिकाणी मोठा गोंधळ निर्माण झाला. दरम्यान, किरीट सोमय्या यांना या हल्ल्यानंतर संचिती हॉस्पिटलला दाखल करण्यात आले. या ठिकाणी त्यांची वैद्यकीय तपासणी होणार आहे.

### महाराष्ट्रात सातत्याने लोकशाहीचा मुडदा पाडू नका -देवेंद्र फडणवीस



भाजप नेते किरीट सोमय्यांवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेचा तीव्र शब्दात निषेध नोंदवत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. राज्यात कायदा-सुव्यवस्था आहे की नाही? आरोपांना उत्तर देऊ शकत नाही म्हणून थेट गुंडागर्दीवर उतरायचे? आम्ही कायदा पाळतो, पण याचा अर्थ गुंडागर्दी खपवून घेणार नाही! महाराष्ट्रात सातत्याने लोकशाहीचा मुडदा पाडू नका. किरीट सोमय्या यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा तीव्र निषेध! असे फडणवीस ट्वीटमध्ये म्हणाले आहेत.

### ‘जशास तसे उत्तर देऊ’

*हल्ला केला म्हणून किरीट सोमय्या स्वस्थ बसणार नाहीत, भाजप कायदेशीर पद्धतीने जशास तसे उत्तर देईल, असा इशारा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी शनिवारी पुण्यात पत्रकारांशी बोलताना दिला. ते म्हणाले की, सभ्यतेचा पांघरलेला बुरखा आता फाटला असून सर्व ठिकाणी राज्यातील सत्ताधाऱ्यांचा मूळ चेहरा दिसू लागला आहे. मुद्दे संपल्यामुळे ते गुद्द्यांवर आले आहेत. भावना गवळी यांच्या प्रकरणात यवतमाळमध्ये किरीट सोमय्या यांच्यावर हल्ला करण्यात आला म्हणून ते घाबरून घरी बसले नाहीत. ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ यांच्या प्रकरणात तर किरीट सोमय्या यांना त्यांच्या मुंबईतील निवासस्थानीच स्थानबद्ध करायचा प्रयत्न झाला पण त्यामुळे ते घाबरून घरी बसले नाहीत. आजच्या शिवसैनिकांच्या हल्ल्यामुळेही सोमय्या घाबरून गप्प बसणार नाहीत.*

### गणेश दर्शन



**पनवेल : माघी गणेशोत्सवानिमित्त महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी परिसरात विविध ठिकाणी जाऊन गणपतीचे दर्शन घेतले. या वेळी भाजप नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.** (अधिक छायाचित्रे पान ६ वर..)

## आम्ही राष्ट्रवादी, शिवसेनेच्या मागे फरफटत जाणार नाही -नाना पटोले

**पुणे : प्रतिनिधी**



पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये सध्या आगामी महानगरपालिका निवडणुकीत राज्यात महाविकास आघाडी म्हणून एकत्र आलेले शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस हे तिन्ही पक्ष एकत्र येणार नसल्याचेच संकेत मिळत आहेत. आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी असे म्हटले की, आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेमागे फरफटत जाणार नसल्याचे म्हणत याला दुजोरा दिलाय. ते पिंपरी-चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

नाना पटोले म्हणाले, पक्षांनी त्यांच्या भूमिका स्पष्ट केल्या आहेत. त्यामुळे आम्ही त्यांच्या पाठीमागे फरफटत जाणार नाही. कोण मजबूत आहे हे नेते ठरवत नाहीत तर जनता ठरवते.

## मंत्री थोरातांच्या संगमनेरमधूनही वाईन विक्रीच्या निर्णयाला विरोध

**अहमदनगर : प्रतिनिधी**

सुपर मार्केट आणि किराणा दुकानांमध्ये वाईन विक्रीला परवानगी देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला काही राजकीय आणि सामाजिक घटकांकडून विरोध होत आहे. आता ज्यांच्यासंबंधी हा निर्णय घेण्यात आला आहे, त्या किराणा दुकानदारांनीही याला विरोध करण्यास सुरुवात केली आहे. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या संगमनेरमधील संगमनेर किराणा असोसिएशनने तहसीलदारांना निवेदन देऊन या निर्णयाचा निषेध केला आहे.

शिर्डी लोकसभा मतदारसंघात या निर्णयाची अंमलबजावणी होऊ देणार नाही, असा इशारा भाजपचे खासदार डॉ. सुजय विखे यांनी दिला आहे. त्यानंतर आता संगमनेरच्या किराणा दुकानदारांची ही भूमिका समोर आली आहे. संगमनेर किराणा असोसिएशनचे श्रीगोपाल रामनाथ पडताणी, पदाधिकारी जगदीश बद्दर, नितीन गुंजाळ, मुकेश कोठारी, शरद गांडोळे यांनी संगमनेरच्या तहसीलदारांना यासंबंधी निवेदन दिले आहे. त्याच्या प्रती मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनाही पाठवण्यात आल्या आहेत.

राज्य सरकारचा वाईन म्हणजे दारूसंबंधी झालेला निर्णय अत्यंत दुर्दैवी, समाजघातक, राष्ट्रघातक, नीतीमत्तेच्या शिलाचा संहार करणारा आहे. उगवत्या पिढीला नितीमत्ता, शील व संस्कृती यापासून भरकटत विनाशाच्या दिशेने नेणारा निर्णय आहे. हा निर्णय तत्काळ मागे घ्यावा, असे निवेदनात म्हटले आहे.

## अण्णा हजारेंचा वाईन विक्रीविरोधात उपोषणाचा इशारा

**अहमदनगर :** ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पुन्हा एकदा उपोषणाचे हत्यार उपसण्याचा इशारा राज्य शासनाला दिला आहे. या वेळी दुकानात वाईन विक्रीच्या सरकारच्या निर्णयाविरोधात हजारेंनी आपली भूमिका मांडली आहे. यासाठी त्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्रही लिहिले आहे.

सरकारने हा निर्णय मागे घ्यावा अन्यथा या निर्णयाविरोधात बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा अण्णांनी पत्रातून महाविकास आघाडी सरकारला दिला आहे.

## अनिल परबांनी राजीनामा द्यावा -चंद्रकांत पाटील

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. माजी गृहमंत्री अनिल देशमुख हेच जर अनिल परब यांच्यावर आरोप करत आहेत, तर त्यांनी राजीनामाच दिला पाहिजे, असे वक्तव्य चंद्रकांत पाटील यांनी केले. भाजपदेखील या सरकारचा काळा चिट्ठा खोलण्याच्या तयारीतच आहे. हे फार काळ चालणार नाही. ’अब जनता आई है, सिंहासन खाली करो’, अशी वेळ या सरकारवर



लवकरच येणार असल्याचे पाटील या वेळी म्हणाले.

शेतकऱ्यांबाबत इतकीच आपुलकी होती, मग त्यांना तुम्ही काय काय दिलेत, याची यादी एकदा जाहीर करा, असे पाटील यावेळी म्हणाले. नुकसानभरपाई नाही, कर्जमाफी नाही, विम्याचा पत्ता नाही, प्रोत्साहन अनुदान नाही, मग या सर्व महत्त्वाच्या विषयांकडे महाविकास आघाडी सरकार लक्ष का देत नाही? असा सवाल यावेळी पाटील यांनी केला. हे एखाद्या टोळीचे शासन असते, तसे राज्यात सुरू आहे. महाराष्ट्रात नक्की चाललेय काय? राज्य सरकारकडून सुरू असलेला हा व्यवहार महाराष्ट्राला लाजवणारा आहे. परमबीर सिंह यांनी उद्धवजी आणि आदित्य ठाकरेंवरही आरोप केले आहेत. त्यामुळे विरोधी पक्ष म्हणून भाजप कदापी शांत बसणार नसल्याचे पाटील यांनी सांगितले.

राज्यातील पोलीस बदल्यांवर माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी मोठा गौप्यस्फोट केला होता. पोलीस बदल्यांची यादी अनिल परबच आपल्याकडे द्यायचे असा अनिल देशमुखांचा जबाब ईडीच्या चार्जशीटमध्ये नोंदविण्यात आला आहे. यानंतर विरोधकांना सत्ताधाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले आहे. अनिल परब यांनी राजीनामाच द्यावा, अशी मागणी भाजपकडून केली जात आहे.

## काँग्रेसकडून स्टार प्रचारक यादीतून सोनिया, मनमोहन यांना वगळले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसने स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. या यादीत राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्याशिवाय गुलाम नबी आझाद, सचिन पायलट आदींच्या नावांचा समावेश करण्यात आला आहे, तर सोनिया गांधी आणि मनमोहन सिंग यांचा समावेश नाही.

काँग्रेसचे सरचिटणीस मुकुल वासनिक यांनी जारी केलेल्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या स्टार प्रचारकांच्या नव्या यादीत राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्याशिवाय पक्षाचे प्रदेशाध्यक्ष अजय कुमार लल्लू, आराधना मिश्रा, गुलाम नबी आझाद, अशोक गेहलोत, कमलनाथ, भूपेश बघेल, सलमान खुर्शीद, प्रमोद तिवारी, पीएल पुनिया, राजीव शुक्ला, सचिन




पायलट, वर्षा गायवाड यांच्यासह इतर नेत्यांची नावे आहेत. उत्तर प्रदेशात २० फेब्रुवारीला तिसऱ्या टप्प्यातील ५९ जागांवर मतदान होणार आहे.

**मनीष तिवारींना स्थान नाही**

दरम्यान, पंजाब निवडणुकीसाठी काँग्रेसने निवडणूक प्रचारासाठी ३० जणांची स्टार प्रचारक यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये पंजाबमधील आनंदपूर साहीब या लोकसभा मतदारसंघाचे खासदार आणि काँग्रेसच्या कोर ग्रुपमधील नेते म्हणून ओळख असेलल्या मनीष तिवारी यांना स्थान देण्यात आलेले नाही.

माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचे पुत्र आणि सध्याचे तृणमुल काँग्रेसचे सदस्य असलेल्या माजी खासदार अभिजित मुखर्जी यांनी मनीष तिवारी यांचे नाव प्रचारकांच्या यादीतून वगळल्याबद्दल नाराजी व्यक्त करत काँग्रेसच्या कारभारबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. तेव्हा जर माझे नाव यादीत असते तर जास्त आश्चर्य वाटले असते अशी प्रतिक्रिया अभिजित मुखर्जी यांच्या ट्वीटवर मनिष तिवारी यांनी दिली आहे. निवडणूक प्रक्रियेपासून मनिष तिवारी यांना दूर ठेवत एकप्रकारे काँग्रेस श्रेष्ठींनी जी -२३ गटातील काही लोकांबद्दल नाराजी स्पष्टपणे दाखवून दिली आहे.

## लता मंगेशकर यांची प्रकृती स्थिर; आयसीयूमध्ये उपचार सुरू

**मुंबई : प्रतिनिधी**



प्रसिद्ध गायिका लता मंगेशकर यांची प्रकृती गेल्या काही दिवसांपासून चिंताजनक आहे. काही काळापूर्वी त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळत होती, मात्र आता त्यांची तब्येत पुन्हा बिघडल्याने त्यांना रुग्णालयात आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले आहे.

काही दिवसांपूर्वी लता मंगेशकर यांना कोरोनाची लागण व न्यूमोनिया झाला होता. त्यामुळे त्यांच्यावर उपचार सुरू होते. आता पुन्हा त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले आहे. त्यांची प्रकृती गंभीर असून त्यांना आयसीयूमध्ये ठेवण्यात आले आहे तसेच डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती ब्रीच कँडी रुग्णालयाचे डॉ. प्रतीक सदनानी यांनी सांगितले.

लता मंगेशकर या ९२ वर्षांच्या आहेत. सध्या त्यांच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत. त्या लवकर बऱ्या व्हाव्यात यासाठी अनेक जण प्रार्थना करत आहे.

राम प्रहर

**उपसंपादक-मुद्रितशोधक पाहिजेत**

दै. रामप्रहरला ‘उपसंपादक-मुद्रितशोधक’ या पदासाठी दोन जागा भरायच्या आहेत. त्यासाठी पत्रकारितेची पदवी, पत्रकारितेतील किमान पाच वर्षांचा अनुभव, बातम्या संकलन करणे व पाने लावण्याचे कसब आणि मुद्रितशोधनाचे ज्ञान आवश्यक आहे. इच्छुकांनी आपले अर्ज आणि सी.व्ही. (वैयक्तिक माहिती) ramprahar@gmail.com या ई-मेलवर किंवा ७७३८१०६००९ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर पाठवावेत. अधिक माहितीसाठी ९७६९६६४४६४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

**पत्ता : दै. रामप्रहर, अस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, शॉप नं. ४, रुपाली सिनेमागृहाजवळ, पनवेल, ४१०२०६**

## निवडक

### श्रीनगरमध्ये चकमकीत दोन दहशतवाद्यांचा खात्मा

**श्रीनगर :** शहरातील झाकुरा भागात शनिवारी सकाळी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. यामध्ये दोन दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात जवानांना यश आले आहे. हे दहशतवादी लष्कर-ए-तोयबा आणि टीआरएफ या दहशतवादी संघटनांचे होते. दरम्यान, पोलिसांनी हा दशहतवाद्यांकडून शस्त्रदेखील जप्त केली आहेत.


### ड्रायव्हिंग लायसन्स काढण्याच्या नियमांत बदल

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने ड्रायव्हिंग लायसन्स काढण्याच्या नियमांमध्ये महत्त्वाचे बदल केले आहेत. यानुसार, चालकाला आरटीओ कार्यालयात जाऊन कोणत्याही प्रकारची ड्रायव्हिंग टेस्ट देण्याची गरज नसल्याचे सांगण्यात आले आहे. हे नियम केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने अधिसूचित केले असून, हे नियम लागूदेखील झाले आहेत.

## पंढरपुरात वसंत पंचमीनिमित्त विठ्ठल-रुक्मिणी विवाह सोहळा

**पंढरपूर : प्रतिनिधी**

पंढरपूर येथील श्री विठ्ठल आणि रूक्मिणी मातेचा शाही विवाह सोहळा वसंत पंचमीच्या मुहूर्तावर शनिवारी (दि. ५) झाला.

मंगल अक्षता, सनई चौघडे आणि उपस्थित वऱ्हाडी मंडळींच्या उपस्थितीत हा विवाह सोहळा थाटामाटात झाला.

वसंत पंचमी ते रंगपंचमीपर्यंत देवाला शुभ्र पोशाख करून मूर्तीवर गुलालाची उधळण करण्याची परंपरा आहे. त्यानुसार देवाला पांढरा शुभ्र पोशाख परिधान करण्यात आला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मोजक्याच भाविकांच्या उपस्थिती हा सोहळा झाला.

वसंत पंचमीला श्री विठ्ठल आणि रुक्मिणीचा विवाह झाला होता असा उल्लेख एकनाथ महाराजांनी लिहिलेल्या रुक्मिणी स्वयंवरात केलेला आहे. हा विवाह सोहळा पूर्वी उत्पात समाज करीत होते. त्यानंतर आता मंदिर समिती श्री विठ्ठल मंदिरात तर उत्पात समाज वशिष्ठ आश्रम येथे या दिवशी हा सोहळा करून परंपरा जपत आहेत.



# संत रामानुजाचार्यांचे विचार मार्गदर्शक

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन; हैदराबादमध्ये 'स्टॅच्यू ऑफ इक्वॉलिटी'चे लोकार्पण

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

जेव्हा देशात रुढीवादी परंपरा होती, भेदाभेद होता त्याकाळात संत रामानुजाचार्य यांनी समानतेचा विचार दिला. ज्या दलितांना अस्पृश्य समजले जात होते, त्यांना रामानुजाचार्य यांनी सन्मान दिला. त्यांनी भेदाभेद दूर करण्यासाठी आयुष्य वेचले. त्यांचे विचार हे समतेवर आधारित होते. त्यामुळेच त्यांचे विचार आजही तितकेच प्रासंगिक आहेत. त्यांचे हे विचार केवळ देशालाच नव्हे तर जगालाही मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते संत रामानुजाचार्य यांच्या भव्य मूर्तीचे स्टॅच्यू ऑफ इक्वॉलिटीचे लोकार्पण करण्यात आले. पंचधातूने बनलेली ही मूर्ती जगातील दुसरी भव्य मूर्ती आहे. या लोकार्पण सोहळ्यावेळी मोदी बोलत होते. त्यांनी आपल्या भाषणाची सुरुवात संस्कृत श्लोकाने केली तसेच देशवासियांना वसंत पंचमीच्या शुभेच्छाही दिल्या.

ध्याम मूलं गुरुर मूर्ति असे आपल्याकडे म्हटले जाते. आपल्या गुरुची मूर्तीही आपल्या ध्यानाचे केंद्र आहे, कारण गुरुच्या माध्यमातूनही आपल्यासाठी ज्ञान मिळते. जे अबोध आहे त्याचा आपल्याला बोध होतो. अप्रकटला प्रकट करण्याची प्रेरणा आणि सुक्ष्मलाही साकार करण्याचा संकल्प हीच भारताची परंपरा राहिली आहे. युगानुयुगे मानवाला दिशा दाखवेल अशा मूल्यांचे आपण नेहमीच पालन केले आहे. या भव्य मूर्तीद्वारे भारत मानवीय ऊर्जा आणि प्रेरणेला मूर्त स्वरुप देत आहे. ही मूर्ती रामानुजाचार्य यांचे ज्ञान, वैराग्य आणि आदर्शांचे प्रतिक आहे. मला विश्वास आहे की ही प्रतिमा केवळ येणाऱ्या पिढीलाच प्रेरणा देणार नाही तर भारताच्या प्राचीन परंपरेला मजबूत करेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.


डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक समाजसुधारक होते. तेही रामानुजाचार्यांच्या शिकवणीचे दाखले देत. रामानुजाचार्यांचे विचार आचरणात आणा. त्यांची शिकवण अंगिकारा, असे बाबासाहेब नेहमी म्हणायचे, असे मोदींनी सांगितले. सर्वांना सामाजिक न्याय मिळाला पाहिजे. ज्यांना वर्षानुवर्ष नाकारण्यात आले त्यांना मुख्य प्रवाहात आणले पाहिजे.

आजचा भारत या समाजाच्या उत्थानासाठी काम करीत आहे. दलितांचा विकास करीत आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## जागतिक कर्करोग दिनानिमित्त व्याख्यान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील महिला विकास कक्षार्फे शुक्रवार (दि. ४) जागतिक कर्करोग दिनानिमित्त महिला आरोग्य व कर्करोग जागरूकता या विषयावर ऑनलाइन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.




या कार्यक्रमासाठी डॉ. गौरी जोशी या प्रमुख वक्ता म्हणून उपस्थित होत्या. हा दिवस साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश कर्करोगाच्या गंभीर आणि जीवघेण्या आजाराबाबत जनजागृती करणे आणि या आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांना मदत करण्यासाठी लोकांना प्रोत्साहित करणे हा आहे. डॉ. गौरी जोशी यांनी आपल्या व्याख्यानातून महिलांना कर्करोग या गंभीर आजारापासून सुरक्षित कसे राहता येईल, याबाबत जागरुकता निर्माण केली.

या वेळी महाविद्यालयाचे प्रचार्य डॉ. संजय मराठे यांनी विद्यार्थ्यांमध्ये कर्करोगाविषयी जागरुकता निर्माण करणे हे अत्यावश्यक असल्याचे नमूद केले. महिला विकास कक्ष प्रमुख प्रा. अंकिता जांगिड यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिले. प्रा. सानिया नाचन यांनी अतिथींचे व उपस्थितांचे स्वागत केले. तसेच आभार मानले. या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी प्रा. मानसी शाह व प्रा. स्नेहा चोगले यांनी सहकार्य केले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कर्करोगाविषयी जागरुकता निर्माण केल्याबद्दल आयोजकांची प्रशंसा केली. संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी मुलाखत प्रशिक्षण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील व्यवसायिक शिक्षण शाखेतील तसेच तंत्रशिक्षण व पारंपरिक शाखेतील विद्यार्थ्यांच्या मुलाखतीविषयी असलेल्या समस्या दूर करण्यासाठी इंग्लिश असोसिएशनच्या अंतर्गत गुरुवारी (दि. ३) मुलाखत प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमासाठी इंग्लिश असोसिएशनच्या डॉ. महादेव चव्हाण यांनी समिती स्थापन केली. त्यामध्ये महाविद्यालयातील विविध शाखांच्या प्राध्यापकांचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राहुल कांबळे, प्रा. सुहास धानवे, प्रा. मानसी शाह यांनी केले. मुलाखतीची रुपरेषा व त्यावरील विचारविनिमय करण्यासाठी मुलांना प्रेरित करण्याचा संकल्प समोर ठेवून समितीने विद्यार्थ्यांच्या विविध स्तरांवरील प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन मुलाखतीविषयीची प्राथमिक भीती दूर करण्याचे कार्य केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय मराठे यांनी कार्यक्रमाच्या अहवालाचे अवलोकन केले. त्यांनी मुलाखत प्रशिक्षणाच्या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांच्या कामगिरीचा वृतांत पडताळून प्रत्येक विद्यार्थ्यांची क्षमता वाढावी या दृष्टीने त्यांना वैयक्तिक अभिप्राय देण्याचे सूचित केले.




## सीकेटी महाविद्यालयात कर्करोग दिनानानिमित्त ऑनलाइन अतिथी सत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक कर्करोग दिनाच्या औचित्याने महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींमध्ये कर्करोग तथा विशेषत्वाने स्तनांचा कर्करोग यासारख्या गंभीर आजाराबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्‌र्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज न्यू पनवेल (स्वायत्त)च्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभाग तथा प्राणीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि. ४) ऑनलाइन अतिथी सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

अतिथी सत्रास अँस्टर आधार रुग्णालय कोल्हापूर येथील प्रख्यात ऑन्कोसर्जन डॉ. बसवराज कडलगे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविकात सीकेटीच्या एनएसएस विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. सूर्यकांत परकाळे यांनी महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विद्यार्थीकेंद्रित आरोग्यविषयक उपक्रमाचा मागोवा घेतला. प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांसोबतच संस्थेच्या व्यवस्थापनाकडून मिळणाऱ्या सहकार्य व मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

प्रमुख अतिथी डॉ. बसवराज कडलगे यांनी कर्करोग म्हणजे काय? यासोबतच महिला व युवतींमध्ये उद्‌भवणाऱ्या स्तनांचा कर्करोगाविषयी भाष्य करीत त्याची लक्षणे, मॅमोग्राफी, सोनोग्राफी, एक्स रे यांसारख्या अद्यावत निदान प्रक्रियेबाबत भाष्य केले. यानंतर विद्यार्थ्यांसाठी प्रश्नोत्तरांचे संक्षिप्त सत्र झाले. एनएसएस विभागाच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. योजना मुनीव यांनी अतिथी परिचय दिला. सूत्रसंचालन पोर्णिमा गायकवाड या स्वयंसेविकेने केले. एनएसएस विभागाच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. अपूर्वा ढगे यांनी आभार मानले.

या वेळी एस.एम.डी.एल. कॉलेज कळंबोलीचे सहयोगी प्राध्यापक डॉ. बबन जाधव, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, मानव्यविद्याशाखेचे शाखाधिपती प्रो. डॉ. बी. एस. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे शाखाधिपती प्रो. डॉ. एस. बी. यादव, विज्ञान विद्याशाखेच्या शाखाधिपती डॉ. ज्योत्स्ना ठाकूर, महिला विकास कक्ष तथा इतिहास विभागाच्या प्रमुख डॉ. आर. डी. म्हात्रे, सायन्स असोसिएशनच्या प्रमुख प्रा. प्रतिभा जाधव आदी प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राणीशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. मंदा म्हात्रे व त्यांच्या विभागातील सहकारी प्राध्यापकांचे सहकार्य लाभले. यासोबतच एनएसएस विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. सूर्यकांत परकाळे, कार्यक्रम अधिकारी प्रा. गणेश साठे, प्रा. सत्यजित कांबळे, डॉ. योजना मुनीव, प्रा. सागर खैरनार, प्रा. अपूर्वा ढगे, प्रा. आकाश पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी एनएसएस तथा प्राणीशास्त्र विभागाचे कौतुक केले.

## पटेल ज्वेलर्सच्या दागिन्यांची कमी किंमत आणि योग्य भाव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील पटेल ज्वेलर्सच्या सर्व शोरूममध्ये ग्राहकांची खरेदी सुलभ व कमीत कमी योग्य किंमतीत व्हावी म्हणून या पुढे कुठलाही दागिना किंवा वस्तू पीएसपीवर विकली जाईल. पीएसपी म्हणजे पटेल ज्वेलर्स का सही प्राईज. पीएसपी ही किंमत इतर कुठल्याही ब्रँड किंवा दुकानांच्या तुलनेने कमीत कमी व योग्य भावात असेल.

ग्राहकांना यापुढे पटेल ज्वेलर्सच्या कोणत्याही शोरूममध्ये खरेदी करताना आता भाव करण्याची गरजच नाही. खरेदी करताना किमतीच्या दृष्टीने ग्राहक निश्चिंत असेल. एखाद्या दागिना किंवा वस्तूची किंमत पटेल ज्वेलर्सच्या सर्व शोरूममध्ये सारखीच असेल जी फिक्स रेटला कमीत कमी व योग्य भावात असेल. कमीत कमी व योग्य भावात फिक्स रेट या धोरणाचे आमच्या ग्राहकांनी सुद्धा स्वागत केले आहे. आता यापुढे पटेल ज्वेलर्सच्या




सर्व शोरूममध्ये खरेदी करताना ग्राहकांच्या मनात किमतींविषयी कोणतीही शंका नसेल. पटेल ज्वेलर्स यापुढेही आमच्या ग्राहकांना अधिकाधिक चांगली सेवा देण्याच्या पटेल ज्वेलर्सचा प्रयत्न राहील.

पटेल ज्वेलर्स या पनवेलमधील छोट्याशा दुकानापासून ते पटेल ज्वेलर्स हा ज्वेलरी शोरूमच्या चेनचा ब्रँड कसा झाला या मागे विश्वास हीच परंपरा हे ब्रीद वाक्य आहे. पनवेलच्या जोशी आळी येथे अनेक छोटी-छोटी ज्वेलर्सची दुकाने होती, त्यामुळे या गल्लीला पनवेलचा झवेरी बाजार हे नाव पडले. या सर्व दुकानांच्या गर्दीमध्ये १९९२ साली पटेल ज्वेलर्स या नावाने मगनभाई पटेल व प्रफुल्ल पटेल व नवनीत पटेल यांनी १५० फुटाचे ज्वेलरीचे दुकान सुरू केले, हे छोटे दुकान अल्पावधित प्रसिद्ध झाले.

पटेल ज्वेलर्सच्या यशामागे मगनभाई पटेल, प्रफुल्ल पटेल व नवनीत पटेल यांची मेहनत आहे. पटेल ज्वेलर्स हा आता एक मोठा ब्रँड झाला आहे. पटेल ज्वेलर्समध्ये लेटेस्ट व्हरायटीमध्ये सोन्या-चांदीच्या दागिन्यांची असंख्य डिझाईन्स, पारंपरिक दागिने, हॉलमार्क दागिने, तुमच्या डिझाईन्सनुसार बनवून मिळणारे दागिने, ब्रँडेड हिऱ्याचे दागिने, प्लॅटिनम दागिने, सोन्या-चांदीमध्ये देवांच्या मूर्ती, दागिने व पूजेचे साहित्य, दागिने पॉलिश, दागिने रिपेरिंग हे सारे पटेल ज्वेलर्सच्या सर्व शोरूममध्ये उपलब्ध आहे.

## • माघी गणेश दर्शन •



श्री गणेश मित्रमंडळ, पाले



संगीता बागकर, खांदा कॉलनी



कालिदास कावले, खांदा कॉलनी



केशव राणे, तक्का, पनवेल



किशोर मुंढे, कामोठे



पनवेल : भाजप तालुका ओबीसी मोर्चाचे सचिव उमेश पाटील यांना वाढदिवसानिमित्त तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, केळवणे जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी शुभेच्छा दिल्या.



पनवेल : येथे नव्याने सुरू झालेल्या चितळे एक्सप्रेस या दुकानाला महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत दुकानचालक दिलीप कर्वे व पुष्कर कर्वे यांना नवीन व्यवसायासाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी नगरसेवक नितीन पाटील, उमेश इनामदार, अनेश ढवळे, गिरीश चितळे, केदार चितळे आदी उपस्थित होते.



नवीन पनवेल : सेक्टर १६ बापदेव क्रिकेट स्टेडियम येथे न्यू पनवेल क्रिकेट लीगचे आयोजन करण्यात आले आहे. या क्रिकेट लीगचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले. या वेळी या स्पर्धेचे आयोजक विशाल जितेकर, परेश घरत, विनोद वाघमारे, तेजस म्हात्रे, त्याचबरोबर भाजप युवा मोर्चा सदस्य राकेश भुजबळ, भाजप नेते रवी नाईक उपस्थित होते.




पनवेल : टपाल नाका येथील नव्याने सुरू केलेल्या हरिओम कट्टा हॉटेलला शनिवारी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत प्रशांत करपे यांना नवीन व्यवसायासाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी नगरसेवक नितीन पाटील, उमेश इनामदार उपस्थित होते.

## पनवेलमध्ये एका बारवर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील कोन गावाच्या हद्दीत असलेल्या क्रेझी बॉईज आर्केस्ट्रा बारवर सहाय्यक पोलीस आयुक्त सोनवणे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांच्या पथकाने कारवाई केली आहे. कोरोना काळात शासकीय नियम धाब्यावर बसवून बार सुरू ठेवल्याप्रकरणी व क्षमतेपेक्षा जास्त लोक जमा केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

तालुक्यातील क्रेझी बॉईज या बारमध्ये मोठ्या संख्येने लोक जमा झाल्याची माहिती गुप्त बातमीदाराकडून मिळताच पोलिसांच्या पथकाने रात्रीच्या वेळेस छापा टाकून त्या ठिकाणावरून १६ मुली, पाच वेटर, तीन मॅनेजर, ११ ग्राहक यांच्यासह ४१ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे. त्यांच्याविरुद्ध कोरोनाच्या नियमांचे उल्लंघन, विर्भित्स हावभाव करून नाचणे, ग्राहकांना आकर्षित करणे, आपत्तकालीन अधिनियमन अशासह शासनाचे विविध नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल कारवाई केली आहे. कारवाईमुळे पनवेल परिसरातील अनेक आर्केस्ट्रा बारसह इतर बारचेही धाबे दणाणले आहेत.

## माजी शिक्षक आमदार संजीवनी रायकर यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**

माजी शिक्षक आमदार आणि राज्य शिक्षक परिषदेच्या मुंबई कार्याध्यक्षा संजीवनी रायकर यांचे शनिवारी (दि. ५) निधन झाले. संपूर्ण आयुष्य शिक्षण व शिक्षक चळवळीसाठी खर्ची घातलेल्या संजीवनीताईंनी मुंबईच्या सुश्रुषा रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला.




१९८८ साली शिक्षक मतदारसंघाची पहिली निवडणूक झाल्यानंतर तीन वेळा शिक्षक आमदार म्हणून संजीवनी रायकर निवडून आल्या होत्या. वात्सल्य या अनाथ मुलांच्या संस्थेच्या त्या संस्थापक अध्यक्षा होत्या. अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक महासंघाच्या त्या राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून काम केले. अखिल भारतीय माध्यमिक शिक्षक महासंघ याच्या राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून कार्यरत होत्या.

विधान परिषद व शिक्षक परिषद या माध्यमातून शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आयुष्यभर झटणाऱ्या समर्पित आणि निस्पृह नेत्या संजीवनी रायकर यांच्या निधनाने राज्यातील शिक्षण क्षेत्राचे अपरिमित नुकसान झाले आहे, अशी श्रद्धांजली भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी शनिवारी अर्पण केली.

## धर्मीबाई पाटील

दुखवटा

**पेण :** तालुक्यातील उर्णोली येथील १०४ वर्षीय धर्मीबाई नथुराम पाटील यांचे नुकतेच निधन झाले. धर्मीबाई या शेवटपर्यंत नेहमीच स्वतःच्या कामात मग्न असायच्या. त्या धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यामुळे त्यांना भजन, कीर्तन, प्रवचन याची आवड होती. त्यांच्या पश्चात पाच मुले, एक मुलगी, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.



# गणेश जयंतीनिमित्त स्वच्छतेची जनजागृती

## शून्य कचरा उपक्रम राबवून सामाजिक संदेश

**पनवेल : प्रतिनिधी**

'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत 'स्वच्छ सर्वेक्षण २०२२' मध्ये पनवेल महापालिकेच्यावतीने घनकचरा व्यवस्थापन विषयक विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्यामध्ये लोकसहभागावर भर देण्यात येत आहे. या अनुषंगाने नागरिकांना त्यांच्या विविध सभा, समारंभ थ्री आर संकल्पनेनुसार साजरे करण्याचे आवाहन पनवेल महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे आहे. त्यास नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. तोंडरे गावातील दिनेश बाळाराम पाटील यांच्या कुटुंबियांनी माघी गणेश जयंतीचे औचित्य साधून आयोजित केलेला कार्यक्रम 'शून्य कचरा' (झिरो वेस्ट इव्हेंट) संकल्पनेस अनुसरून साजरा केला.

या कार्यक्रमात कोणत्याही प्रकारच्या प्लास्टीकचा जराही वापर करण्यात आला नाही. यामध्ये विशेषात्वाने भाविकांची भोजन व्यवस्था पर्यावरणाचे भान जपत केळीच्या पानावर करण्यात आलेली होती. पाणी आणि सरबत पिण्याकरीता कागदाच्या (Bio degradable environment friendly drinking cup) व स्टीलच्या ग्लासचा वापर करण्यात आला. याशिवाय मंडपातील व्यवस्थेवरही विशेष लक्ष देण्यात आले होते तसेच कार्यक्रमाच्या सजावटीकरीता रंगीत कागदाचा, कापडाचा व बॅनर्सकरिता कार्डबोर्डचा वापर करण्यात आला. स्वच्छ भारत अभियान जनजागृतीपर उत्कृष्ट रांगोळी काढण्यात आलेली होती. कार्यक्रम झाल्यानंतर उरलेले अन्न गरीबांना वाटप करण्याकरिता देण्यात आले तसेच उरलेला ओला कचरा कंपोस्ट करण्याकरीता कंपोस्ट पीटामध्ये टाकण्यात आला.






**पनवेल महापालिकेतर्फे आवाहन**

***स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन नियमांविषयी जागरूक राहून अगदी कौटुंबिक समारंभामध्येही स्वच्छता नियमांचे पालन करणाऱ्या पाटील कुटुंबियांच्या स्वच्छताप्रेमाचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. पाटील कुटुंबीयांनी पनवेलकरांसमोर स्वच्छतेविषयक नवीन आदर्श ठेवलेला आहे. नागरिकांनी अशा प्रकारे 'शून्य कचरा' संकल्पनेतून आपले कार्यक्रम करावे, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.***

कोविड प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करून मर्यादित उपस्थितीत कार्यक्रम झाला. तेथे ओला व सुका कचरा टाकण्याकरिता स्वतंत्र कचराकुंड्या ठेवण्यात आलेल्या होत्या. त्यावर 'माझा कचरा – माझी जबाबदारी' असा संदेश तसेच वॉश बेसिनजवळ 'पाणी वाचवा' असा संदेश दर्शनी भागी प्रदर्शित करण्यात आला होता. तसेच येणाऱ्या भाविकांकरीता सॅनिटायझर व मास्कची व्यवस्था करण्यात आलेली होती.

या वेळी पनवेल महानगरपालिकेचे प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी, स्वच्छ भारत वरिष्ठ सल्लागार मधुप्रिया आवटे, स्वच्छता निरिक्षक अजिंक्य दळवी, पराग पाटील व इतर पालिका कर्मचारी उपस्थित होते.



## गव्हाण विद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमाला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये इयत्ता बारावी आर्ट्स व कॉमर्सच्या विद्यार्थ्यांना बाह्य तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या विशेष विषयनिहाय मार्गदर्शनपर व्याख्यानांची मालिका नुकतीच सुरू झाली.

विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी व समन्वय समितीचे सदस्य अरुणशेठ भगत यांच्या संकल्पनेतून दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून ज्युनिअर कॉलेजमधील इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शनाची व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे.

पनवेल येथील चांगू काना ठाकूर कनिष्ठ महाविद्यालयातील विविध विषयांच्या तज्ज्ञ प्राध्यापक या मालिकेअंतर्गत मार्गदर्शन करीत आहेत. त्यामध्ये अर्थशास्त्र या विषयाचे प्रा. प्रदीप देशमुख, अकाऊंन्टसी या विषयाचे प्रा. शशिकांत भोसले तर इंग्रजी या विषयासाठी प्रा. उत्तमराव औटे यांचे विशेष मार्गदर्शन पर व्याख्यान आयोजित करण्यात आले. इतिहास विषयाचे व्याख्यान प्रा. माणिक घरत यांनी घेतले.

या सर्व प्राध्यापकांचे विद्यालयाच्या प्राचार्य साधना डोईफोडे यांनी स्वागत केले. जुनियर कॉलेज विभागप्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य तसेच रयत को-ऑपरेटिव बँकेचे संचालक प्रमोद कोळी, विद्यालयाचे उपप्राचार्य जगन्नाथराव जाधव या वेळी उपस्थित होते.

ज्युनिअर कॉलेजचे सर्वश्री प्रा. राजेंद्र चौधरी, प्रा. उमेश पाटील, प्रा. राजू खेडकर तसेच प्रा. अर्चना पाटील, प्रा. जयवंती ठाकूर, प्रा. माणिक घरत आदी व बारावीच्या बोर्ड परीक्षेला प्रविष्ठ असणारे विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

## शिरढोणमध्ये गॅस गिझरचे वाटप

**पनवेल : वार्ताहर**

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेंतर्गत वन्यजीव ठाणे, कर्नाळा पक्षी अभयारण्या अंतर्गत ग्रामपरिस्थितीकीय विकास समिती शिरढोण यांच्या वतीने शिरढोण ग्रामपंचायत हद्दीतील ७६ लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदानात गॅस गिझरचे वाटप करण्यात आले.



शिरढोण ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा ग्रामपरिस्थितीकीय विकास समिती शिरढोण अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या निवासस्थानी शुक्रवारी (दि. ४) हा कार्यक्रम झाला. पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबवण्यासाठी वन विभागाच्या सहकार्याने राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत मंगेश वाकडीकर यांनी वन अधिकाऱ्यांचे आभार मानले तसेच गॅस गिझरविषयी उपस्थित लाभार्थ्यांना माहिती दिली.

या आधी ग्रामपरिस्थितीकीय विकास समितीच्या माध्यमातून ३२५ कुटुंबाना गॅस सिलिंडर, ९८ महिलांना शिलाई मशीनचेदेखील वाटप करण्यात आले आहे. या वेळी कर्नाळा वनपरिक्षेत्र अधिकारी राठोड, वनपाल वाघमारे, वनसंरक्षक जाधव, सरपंच साधना कातकरी, उपसरपंच मोनाली घरत, सदस्य प्रमोद कर्नेकर, विजय भोपी, भाऊ वाजेकर, निकिता चौधरी आदी उपस्थित होते.





**पनवेल : वांगणी तर्फे वाजे ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व विद्यमान सदस्य संतोष शेळके यांना वाढदिवसानिमित्त भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप नेते वाय. टी. देशमुख, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, केळवणे जि. प. विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपसरपंच प्रवीण म्हात्रे, माजी सरपंच सतीश मालुसरे, गुरुनाथ भोईर, विठ्ठल पाटील, आदई बुथ अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील उपस्थित होते.**

## खांदा कॉलनीत पोळी भाजी, स्नॅक्स कॉर्नरचे उद्‌घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनी सेक्टर ९ येथील श्रीकृष्णा गार्डन सोसायटी येथे कुणबी समाज संस्था, पनवेल यांच्या महिला विभाग पदाधिकाऱ्यांनी एकत्र येऊन श्री अन्नदा पोळी भाजी आणि स्नॅक्स कॉर्नर सुरू केले आहे. शुक्रवारी (दि. ४) माघी गणेशोत्सव दिनी या केंद्राचे उद्‌घाटन करण्यात आले.



या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून कुणबी समाजोन्नत्ती संग- मुंबईचे कार्यकारी सदस्य तथा कुणबी राजकीय संघटन समितीचे अध्यक्ष, उद्योजक कृष्णा कोबनाक, कार्य-सदस्य तथा कोकण बळीराजा शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अथवा सहकार क्षेत्रातील नामवंत एकलव्य युनिव्हर्सल सहकारी पतसंस्था, मुंबईचे संस्थापक संभाजी काजरेकर उपस्थित होते. कुणबी समाज संस्था पनवेलचे अध्यक्ष रमेश फलसमकर, सचिव अनिल मोंडे, विवाह मंडळ अध्यक्ष बबन मांडवकर, उदय महादे, 'म्हसळा टाईम्स'चे संपादक रमेश पोटले, अनंत इर्मल, चाचले हे उपस्थित होते. विशेष उपस्थिती योगिता मॅडम, एकलव्य सहकार परिवार यांची लाभली.

या सोहळ्यासाठी श्री अन्नदाच्या प्रमुख निमंत्रक आणि कुणबी समाज संस्था, पनवेलच्या महिला अध्यक्ष लिना महेंद्र रटाटे व संध्या उदय महादे आणि त्यांचे परिवार यांनी विशेष परिश्रम घेतले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बुजुर्ग अध्यक्ष फलसमकर व ध्येयवादी नेतृत्व अनिल मोंडे यांचे योगदान होते.

## रसायनीतील डॉ. पायल मते यांची भरारी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

बरेली आंतरराष्ट्रीय विद्यापीठ, रोहीलखंड मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल येथे फेलोशीप कार्यक्रमाचे एक वर्ष संपन्न झाल्याच्या उद्देशाने ओरल कॅन्सर सर्जरी क्लिनिकल मिट या विषयावर चर्चासत्र आयोजित केले होते. सरासरी शंभर लोकांमध्ये एक व्यक्ती तोंडाच्या कर्करोगाने मृत्यू पावते, अशा या भयानक समस्येला कसे सामोरे जाता येईल तसेच इतर महत्त्वाच्या समस्या याबद्दलच्या चर्चासत्रात रसायनीच्या डॉ. पद्माकर मते यांच्या कन्या डॉ. पायल पद्माकर मते यांनी आपली मौलिक मतं यावेळी इतर मान्यवरांसोबत मांडली.



केआयएमएस कॉलेज (कृष्णा इन्स्टिटच्यूट ऑफ मेडिकल सायन्स), कराड येथे त्या ओरल आणि मॅक्सिलोफेशियल (पुनर्रचनात्मक) शस्त्रक्रिया यामध्ये विद्यापीठात टॉपर होत्या. तोंडाचा कर्करोग आणि पुनर्रचनात्मक शस्त्रक्रियेमध्ये त्यांना बरेली आंतरराष्ट्रीय विद्यापीठाची फेलोशिप मिळाली आहे.

नुकत्याच त्या बरेली आंतरराष्ट्रीय विद्यापीठ अंतर्गत रोहीलखंड मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, उत्तर प्रदेश येथे महत्त्वाच्या पदावर कार्यरत आहेत. या त्यांच्या यशात रसायनीतील वडील डॉ. पद्माकर मते आणि आई डॉ. मधुमती मते यांचा सिंहाचा वाटा आहे.

## • माघी गणेश दर्शन •











**पनवेल : माघी गणेशोत्सवानिमित्त भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी विविध ठिकाणी विराजमान गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी आयोजकांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. सोबत भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते होते.**



**खारघर : भाजप नेते प्रभाकर घरत यांनी बेलपाडा गावातील माघी गणेशोत्सवानिमित्त विराजमान गणरायाचे दर्शन घेतले.**



**पनवेल : कराडे खुर्दचे ग्रामपंचायत सदस्या योगेश्री मुरकुटे, उद्योगपती योगेश मुरकुटे यांनी कैरे गावात गणपतीचे दर्शन घेतले.**

**प्रोसेस जमा ता.**

**मा. मुजावर साहेब कोर्ट**
**नि. ८/ड**
**ॲड. इर्शाद आर. शेख पनवेल**
**अर्जदारांचे वकील**
**ने.ता. १६/०३/२०२२**

**जाहीर नोटीस**

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात...**

**दि. चौ. अर्ज क्र. १४२/२०२२**

१) श्रीमती. सुप्रिया सुरेंद्र कदम
वय- ४६ वर्षे, धंदा- गृहिणी
२) अथर्व सुरेंद्र कदम
वय- २१ वर्षे, धंदा- शिक्षण
३) आर्या सुरेंद्र कदम
वय- १६ वर्षे, धंदा- शिक्षण
क्र. १ स्वत:करिता व क्र. २ चे अज्ञान पालन करणार आई म्हणून
सर्व रा. स्पॅगेटी, के ५, रुम नं. ११,
सेक्टर १५, खारघर, नवी मुंबई
ता. पनवेल, जि. रायगड
} **अर्जदार**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ यांचे पती आणि अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील कै. सुरेंद्र बजरंग कदम यांचे दि. २०/०३/२०२१ रोजी सुअस्थ हॉस्पिटल, रोडपाली, ता. पनवेल येथे निधन झाले आहे. कै. सुरेंद्र बजरंग कदम यांची आई कै. सुनंदा बजरंग कदम यांचे देखील दि. ०२/०३/२००९ रोजी देहावसान झाले आहे. **श्रीमती. सुप्रिया सुरेंद्र कदम** वगैरे ह्यांनी कै. सुरेंद्र बजरंग कदम यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

कै. सुरेंद्र बजरंग कदम यांच्या नावे असलेल्या स्थांवर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| | |
|---|---|
| अ | मौजे-कोयनावेळे, ता. पनवेल, जि. रायगड येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील ग्रामपंचायत घर क्र. २४१, क्षेत्र २८८ चौरस फुट म्हणजेच २६.७६ चौ. मीटर अशा वर्णनाची घर मिळकत. |
| ब | मौजे-खारघर, ता. पनवेल, जि. रायगड येथील सेक्टर १५ मधील भूखंड क्र. २२ वरील स्पॅगेटी को.ऑप. हौसिंग सोसायटी या इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. के५/३:११, बिल्डींग नं. के५, क्षेत्र ५०.३४ चौ.मी., सोबत कार पार्किंग नं. बी- केएचजी-एसपी२-पीसी-के-१ अशा वर्णनाची मिळकत. |

वर **श्रीमती. सुप्रिया सुरेंद्र कदम** वगैरे ह्या कै. सुरेंद्र बजरंग कदम यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट **श्रीमती. सुप्रिया सुरेंद्र कदम** वगैरे, यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. सुरेंद्र बजरंग कदम यांच्या वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक ०५/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**लिपिक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर**
**पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर**
**पनवेल**

# उद्याच्या अपरिहार्य बदलांचे दिशादर्शन करणारा अर्थसंकल्प!

**देशाच्या अर्थसंकल्पाकडे राजकीय आणि करसवलतीपुरता अर्थसंकल्प असे न पाहता, देशाच्या विकासाची येत्या काही वर्षातील दिशा म्हणून पाहिले तर काय दिसते? अर्थसंकल्प देशाला सर्वार्थाने जोडणारा तर आहेच, पण त्यात भारतीय अर्थव्यवस्था टेक ऑफ स्टेजला नेण्याची क्षमताही आहे. कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवर भारताला जगाच्या व्यासपीठावर जी संधी निर्माण झाली आहे, तिचा लाभ जर आपण घेऊ शकलो तर अर्थसंकल्पाने दाखविलेली दिशा वस्तुस्थितीच्या जवळ जाणारी आहे, असे निश्चितच म्हणता येईल.**


## अर्थ प्रहर



**यमाजी मालकर**
(ymalkar@gmail.com)

देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी एक फेब्रुवारी रोजी संसदेत सादर केलेल्या अर्थसंकल्पावर राजकीय, करसवलतीविषयी आणि आपल्याला काय मिळाले, या मर्यादित स्वरूपाची चर्चा घडून गेली आहे. अर्थसंकल्प हा केवळ देश चालविण्यासाठी नव्हे तर त्याच्या वेगवान विकासाचा इरादा जाहीर करणारा महत्त्वाचा दस्तऐवज आहे त्यादृष्टीने त्यावर चर्चा व्हायला हवी, पण ती तशी कधीच होत नाही. आर्थिकदृष्ट्या साक्षर नागरिकांची संख्या तुटपुंजी असल्याने आपल्यावर ही दुर्दैवी वेळ आली आहे. एक हत्ती आणि सहा आंधळ्यांची गोष्ट अर्थसंकल्पावरील पारंपरिक चर्चेला चपखल लागू होते. या सर्व पार्श्वभूमीवर या अर्थसंकल्पाकडे वेगळ्या दृष्टीने पाहता येईल का? त्या दृष्टीने पाहिले तर आपल्याला काय दिसते?

देशाच्या पायाभूत सुविधांसाठी केली गेलेली आतापर्यंतची सर्वाधिक तरतूद, डिजिटल व्यवहार सुलभपणे व्हावेत आणि त्याचा लाभ सर्वांना मिळावा म्हणून त्या तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी करण्यात आलेल्या अनेक तरतुदी, स्वस्तातील प्रवास म्हणून सर्वाधिक वापर केला जात असलेल्या रेल्वेचा वेग आणि विस्तार वाढविण्यासाठीच्या तरतुदी, आर्थिक सर्वसमावेशकता वाढावी यासाठी पोस्ट बँक आणि बँकांच्या सेवांमध्ये समन्वय, सरकारच्या निधीचा वापर अधिक काटेकोरपणे आणि पारदर्शी व्हावा, यासाठी डिजिटल रुपया प्रत्यक्षात आणण्याची घोषणा, इंटरनेट नावाच्या क्रांतीचा दमदार झेप शक्य करणाऱ्या फाईव जी तंत्रज्ञानाला देण्यात आलेली गती, घर बांधण्याच्या स्वप्नाला सरकारी मदतीचा हात, पीएम गतीशक्तीच्या माध्यमातून १०० टर्मिनल बांधण्याची घोषणा... अशा काही प्रमुख तरतुदी पाहता हा देश जोडणारा अर्थसंकल्प आहे, असे म्हटले पाहिजे.



**इन्कमटॅक्सचीच चर्चा अनाठायी**

तुटपुंज्या करसंकलनामुळे भारताकडे सतत असणाऱ्या सरकारी भांडवलाच्या टंचाईचा विचार न करता अर्थसंकल्पात काय काय केले पाहिजे, याविषयीच्या ज्या अपेक्षा केल्या जातात, त्यांना तसा काहीच अर्थ नाही. या वेळी तर लांबलेल्या कोरोना संकटाने जसे नागरिकांना आर्थिक संकटांना सामोरे जावे लागले तसेच देशाचा गाडा हाकताना सरकारलाही आर्थिक कसरत करावी लागली, पण त्याही स्थितीत अप्रत्यक्ष कर जीएसटीची सतत सहा महिने एक लाख कोटी रुपयांवर झालेली वसुली, इन्कमटॅक्स आणि कंपनी या प्रत्यक्ष कराचे याही काळात झालेले चांगले संकलन आणि इंधनावरील करांतून तिजोरीला लागलेला हातभार, यामुळेच अनेक क्षेत्रांसाठीच्या चांगल्या तरतुदी करणे शक्य झाले आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सरकारला अर्थसंकल्पाच्या बाहेर पडून करावा लागलेला खर्च आणि वेळोवेळी जाहीर करावे लागलेले पॅकेजेस पाहता या वेळी कंपन्या आणि नागरिकांवर करांचा बोजा वाढेल अशी शक्यता व्यक्त केली जात होती, मात्र सरकारने कर बोजा न वाढविता तसेच कर वसुली प्रणालीत सातत्य ठेवून, सरकारी महसुलाचा आकडा फार मोठी पडझड न होता सांभाळला, हा मोठाच दिलासा ठरला आहे. इन्कमटॅक्समध्ये सूट देण्यासाठीच जणू बजेट मांडले जाते आणि मध्यमवर्ग हा काहीतरी विशेष वर्ग आहे, अशी जी चर्चा अर्थसंकल्पाच्या निमित्ताने केली जाते, ती अनाठायी आहे. खरे तर वर्गाचा भेदभाव केला जाऊ नये, पण तो करावयाचाच तर देशाच्या विकासाचा सर्वाधिक लाभ हा वर्गच घेत असतो, हे कधीतरी मान्य केले पाहिजे.

**राजकीय आणि आर्थिक स्थर्याचे मोल**

कोरोना संकटामुळे जगातील अनेक देशांमध्ये आर्थिक पेचप्रसंग उभे राहत आहेत, राजकीय अस्थर्य निर्माण होते आहे, अशा या कठीण काळात भारत आज जे स्थर्य अनुभवतो आहे, त्याचे महत्त्व मान्य केले पाहिजे. आर्थिक विषयाची चर्चा करताना त्याचे भान तर ठेवलेच पाहिजे, कारण या संकटाच्या काळात राजकीय नेतृत्व जसे ठामपणे उभे राहिले, तसेच नागरिक म्हणून आपण सर्वांनी कळ सोसली आहे. आर्थिक स्थर्य आणि जीडीपीच्या सर्वाधिक वाढीच्या दराची फळे देशाला मिळत असताना आम्हाला काय मिळाले, असा भेदाभेद करणे म्हणून चुकीचे वाटते. देशाच्या अर्थसंकल्पातून एकूणच भारतीय नागरिकांचे जीवनमान सार्वजनिक सेवासुविधांच्या मार्गाने सुधारते की नाही, याला सर्वाधिक महत्त्व आहे. त्या दृष्टीने अर्थसंकल्पाकडे पाहिले पाहिजे.

## पुढील २५ वर्षांतील बदलांचे संकेत

अर्थमंत्र्यांनी या अर्थसंकल्पातून पुढील २५ वर्षांच्या ज्या दिशेचा निर्देश केला आहे, तो एक भारतीय नागरिक म्हणून आणि गुंतवणूकदार म्हणून सर्वाधिक महत्त्वाचा आहे. ती दिशा काय आहे, हे आता पाहू.

१. सर्व क्षेत्रांमध्ये डिजिटल व्यवहारांमध्ये नजीकच्या भविष्यकाळात प्रचंड वाढ होणार आहे. आतापर्यंत शेती क्षेत्राला त्याचा पुरेसा लाभ मिळाला नव्हता, पण आता तेथेही डिजिटल आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ होणार.

२. आर्थिक व्यवहार पारदर्शी होण्याचा पुढील टप्पा या काळात सुरू होणार. वेतन, व्यवसाय, व्यापार, उद्योगांचे उत्पन्न यापुढे लपविता येणार नाही. आधार, बँक, पॅन कार्ड आणि मोबाइलमुळे सर्व प्रकारच्या उत्पन्नाची नोंद होत असल्याने सरकारचा करमहसूल वाढत जाणार. कर प्रणाली सोपी होत जाणार तसतसे करदातेही वाढतच जाणार त्यामुळे इन्कमटॅक्सचे दर वाढणार नाहीत.

३. क्रिप्टो करन्सीला अधिकृत मान्यता मिळणार नसली तरी आता त्यावर ३० टक्के कर लावल्याने असे महसुलाचे नवे मार्ग सरकार शोधत रहाणार. डिजिटल रुपीमुळे रोखीचे महत्त्व कमी होत जाणार.

४. रस्ते, रेल्वे, जहाज आणि विमान वाहतूक सेवेत चांगली सुधारणा होणार. या सर्व मार्गांनी देश जोडला जाणार.

५. बँकिंगच्या माध्यमातून आर्थिक सहभागीत्व आणखी वाढणार. त्याला पोस्ट बँकेची जोड मिळणार असल्याने त्याला आणखी वेग मिळणार. आर्थिक विषमता कमी करण्याचा हाच सर्वांत प्रभावी मार्ग ठरणार. शेअर बाजाराशी संबधित गुंतवणुकीला महत्त्व येणार. डिजिटलमुळे त्याचा वेगाने प्रसार होणार.

६. पायाभूत सुविधांवर विक्रमी तरतूद होत असल्याने तसेच जगातील भारताचे महत्त्व वाढल्याने भारतीय अर्थव्यवस्था सध्या टेक ऑफ स्टेजमध्ये आली आहे. एवढा ग्राहक इतर देशांत नसल्याने त्याचा लाभ घेण्यासाठी परकीय गुंतवणुकीचा मोठा ओघ भारतात येणार, ज्यामुळे देशातील विकासकामांना भांडवलवृद्धीचा डोस मिळणार.

७. पीएलआय, आत्मनिर्भर भारतसारख्या योजनांमुळे भारतीय कंपन्यांचे उत्पादन, उत्पन्न तर वाढणारच, पण भारताची निर्यातही वाढणार. ज्यामुळे परकीय चलनाचा साठा असाच वाढत राहून आयात निर्यात व्यापारातील तुट कमी होत राहणार.

८. इलेक्ट्रिक वाहनांच्या आणि हरित उर्जा निर्मितीसाठी सरकार देत असलेल्या प्रोत्साहनामुळे भारताच्या इंधन वापरावर परिणाम होऊन भारताचे परकीय चलन वाचणार.

९. असंघटित उद्योग, व्यवसाय, कामगार यांना संघटीत अर्थव्यवस्थेमध्ये सामील करून घेण्यासाठी केल्या जात असलेल्या उद्यम, ईश्रम, एनपीएस सारख्या योजनांचे महत्त्व वाढणार. असंघटित क्षेत्राला संघटीत क्षेत्राशी जोडून घेणे क्रमप्राप्त होणार.

१०. आयटी, स्टार्टअपचे महत्त्व आणि त्यांचा अर्थव्यवस्थेतील वाटा असाच वाढता राहणार.

११. जे नागरिक या बदलांशी जोडून घेऊ शकणार नाहीत, त्यांना जगताना आधार देण्यासाठी सरकारला विशेष प्रयत्न करावे लागतील. त्यासाठी करमहसुलातील मोठा वाटा सामाजिक सुरक्षितता योजनांवर खर्च करावाच लागेल.

# ट्रेडिंगचे प्रकार, त्याचा कालावधी आणि जोखीम

**मागील लेखात ट्रेडिंगसाठी अत्यावश्यक असलेल्या शिस्तबद्धतेबद्दल आपण जाणून घेतलं. आता ट्रेडिंगचे प्रकार आणि त्याच्या कालावधीबद्दल पाहूयात.**



**प्रसाद ल. भावे**
sharpadvisers@gmail.com

**स्कालपिंग :** अगदी थोडक्या नफ्यासाठी ट्रेड करणाऱ्यांना स्कालपर्स म्हणतात. मोठ्या प्रमाणात शेअर्स किंवा युनिट्सची लगेचच खरेदी-विक्री करून झटपट नफा-नुकसान पदरात पडून घेणाऱ्यांस स्कालपर्स म्हणतात. ऑप्शन ट्रेडिंग हे या स्कालपिंग प्रकारात मोडतं ज्यामध्ये मोठ्या पोझिशन्स घेऊन २-५ रुपये नफा घेऊन बाहेर पडणारे असे ट्रेडर्स असतात. अशा व्यवहारांचा कालावधी काही सेकंदांपासून काही तास असू शकतो. या प्रकारच्या ट्रेडिंगमध्ये वेळेला फार महत्त्व असतं. प्रोफेशनल ट्रेडर्स अनेक तंत्रज्ञान वापरून असे व्यवहार करत असतात. यात जोखीम देखील सर्वांत जास्त असते.

**इंट्रा-डे ट्रेडिंग :** यानंतरचा प्रकार म्हणजे इंट्रा-डे ट्रेडिंग, ज्यामध्ये सकाळी बाजार सुरू झाल्यापासून सव्वा तीन वाजेपर्यंत ट्रेडिंग करता येऊ शकतं. हे दोन्ही प्रकार झाले डे-ट्रेडिंगचे.

**स्विंग ट्रेडिंग :** शेअरभावाच्या चढ उताराप्रमाणं त्या त्या शेअर्सची खरेदी करून ठराविक नफ्याचं उद्दिष्ट ठेऊन एक दोन दिवसांत ते एखादा आठवड्यात विक्री करणं यास 'स्विंग ट्रेडिंग' म्हणतात. कोणत्यातरी अफवेमुळं कोण्या कंपन्यांच्या शेअर्सचे भाव खाली येतात आणि ती अफवा आहे हे लक्षात आल्यानंतर स्वस्त मिळत असलेला असा शेअर घेण्यासाठी ट्रेडर्समध्ये चढाओढ लागते आणि त्याचा भाव वधारू लागतो, अशा प्रकारात उद्दिष्ट साधारणपणे २-५ टक्के असू शकतं. शक्यतो स्विंग ट्रेड हे वायद्यामधील कंपन्यांच्या म्हणजेच डेरिव्हेटीव्ह या प्रकारात केले जातात, कारण त्यात शेअर्स खरेदी करण्यासाठी संपूर्ण पैसे भरावे लागत नाहीत.

**पोझिशनल ट्रेड :** म्हणजे ज्या कंपन्यांमध्ये दडलेलं मूल्य आहे अशा कंपन्या शोधून त्यामध्ये बहुतांश गुंतवणूक करून (पोझिशन घेऊन) अपेक्षित वृद्धी झाल्यावर ती विकणं. यामध्ये एक आदर्श पोर्टफोलिओ बनवणं हा उद्देश नसून तुलनेनं कमी कालावधीत नफा मिळवणं हाच उद्देश असतो. याचा कालावधी काही आठवडे ते महिन्यांमध्ये असू शकतो. यामध्ये बहुतेक ट्रेडर्स स्टॉप लॉस ही संकल्पना गृहीत धरत नाहीत.

**दीर्घ मुदतीची गुंतवणूक :** यात मात्र सर्वार्थानं पुढील दशकाचा सारासार विचार करूनच ठराविक उत्तम कंपन्यांमध्ये गुंतवणूक केली जाते, ज्यामध्ये एक संतुलित पोर्टफोलिओ बनवण्यामध्ये कल दिसून येतो, ज्याचा उद्देश संपत्ती निर्मिती हाच असू शकतो. याला मात्र आपण ट्रेडिंग म्हणू शकत नाही.

**भांडवल वृद्धी :** सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे भांडवल वृद्धी. काही ब्रोकर्स हे डे-ट्रेडिंगसाठी आपल्या क्लायंट्सच्या असलेल्या भांडवलाच्या (तरल उपलब्ध रक्कम आणि ब्रोकरकडं असलेल्या शेअर्सचे मूल्य) सुमारे दहापट किमतीचे शेअर्स घ्यायची किंवा विकायची परवानगी देतात, परंतु अशा पोझिशन्स या आपोआप मार्केट बंद व्हावयाच्या आधी ब्रोकर्सकडून बंद केल्या जातात. ट्रेडिंगमध्ये ट्रेडर्स हे शेअर्सच्या भावावर लक्ष ठेऊन असतात (Price movement). ट्रेडिंग हे बाजारात अचूक वेळ साधण्याबाबतचं कौशल्य आहे (To time the market) तर दीर्घ गुंतवणूकीतून उत्तम परताव्याद्वारे व लाभांशाद्वारे संपत्ती बनवणं हा अभ्यास आहे.

**जोखीम :** नक्कीच बाजारात जोखीम ही अध्याहृतच असते मग ते ट्रेडिंग असो वा गुंतवणूक. तरीही, ट्रेडिंगमध्ये जास्त जोखीम व जास्त परतावा असतो कारण तिथं वेळेला जास्त महत्त्व असतं. याउलट गुंतवणुकीत दीर्घ मुदतीत जास्त परतावा मिळू शकतो तरीकमी कालावधीत परतावा कमी जरी असला तरी जोखीम देखील कमी असू शकते, परंतु ट्रेडर्स नफा कमावण्यासाठी ठराविक अवधीत शेअर्स खरेदी-विक्री करतात परंतु त्या वेळेत नफा न झाल्यास वेळ पडल्यास नुकसानीतदेखील तो व्यवहार बंद करावा लागतो. गुंतवणुकीबाबतीतमात्र फारसं वेळेचं बंधन नसल्यानं नफा मिळवेपर्यंत वाट पाहता येऊ शकते.

**कला विरुद्ध कौशल्य :** हे समजून घेऊयात की ट्रेडिंग ही सुपर ओव्हर किंवा २०-ट्वेंटी मॅच आहे तर दीर्घ गुंतवणूक ही टेस्ट मॅचसारखी आहे. ज्याप्रमाणं क्रिकेटमधील टी-२० प्रकारात कोणताही दुबळा संघ बलाढ्य संघास हरवू शकतो म्हणजेच कोणता संघ जिंकेल याची खात्री देता येत नाही अगदी अशीच गोष्ट असते बाजाराच्या बाबतीत. अगदी चांगल्या कंपनीच्या शेअरमध्ये सुद्धा डे-ट्रेडिंगमध्ये नुकसान होऊ शकतं, परंतु दीर्घ काळात त्याच कंपनीच्या शेअर्समधून चांगला परतावादेखील मिळू शकतो. जसं की, राहुल द्रविडसारखा खेळाडू टी-ट्वेन्टी मॅचमध्ये तितका चांगला खेळ करू शकत नाही जितका तो टेस्ट मॅचमध्ये खेळू शकतो. ट्रेडिंग हे मागणी व पुरवठा यांसंबधीच्या गोष्टींवर अवलंबून असतं व त्यासाठी तांत्रिक गोष्टी अभ्यासाव्या लागतात उदा. आलेखावरील कलबदल, आधार व प्रतिकार पातळ्या, तळपातळी अथवा शिखरपातळी तपासणं, इ. याउलट एखाद्या कंपनीत गुंतवणूक करताना कंपनीबाबतच्या मूलभूत गोष्टी तपासून ती करावी लागते. उदा. कंपनीचा व्यवसाय, मार्जिन, अर्थार्जन, विविध रेश्यो इत्यादी.

जरी ट्रेडिंग व गुंतवणूक हे दोन्ही वेगवेगळे प्रकार असतील तरी दोन्ही गोष्टींमध्ये शिस्त गरजेची आहे. ट्रेडिंगमध्ये अजून एक प्रकार असा आहे की ज्यात पडत्या बाजारातदेखील पैसा कमावता येतो. त्याला बाजारात 'शॉर्ट सेलिंग' म्हणतात, म्हणजे शेअर्स जवळ नसतानादेखील आधी विकणं व नंतर खरेदी करून व्यवहार पूर्ण करणं. सर्वसाधारणपणे, एक तर अशा पोझिशन्स एका सत्रात (इंट्रा-डे) बंद कराव्या लागतात अथवा वायदे बाजारात पोझिशन्स घेतल्यास त्या महिन्याच्या ठराविक तारखेच्या आत (एकते तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये). या गोष्टींविषयी पुन्हा कधीतरी पाहू परंतु बाजाराचा रोख ओळखून योग्य पातळीवर शॉर्ट सेलिंगची कला आत्मसात केल्यास अनिश्चिततेत हेलकावणाऱ्या अथवा पडत्या बाजारातदेखील नफा कमावता येऊ शकतो.




## अर्थसाक्षर स्पर्धा : ६
### निकाल पुढीलप्रमाणे

**प्रश्न क्र. १. मेटल (धातू) क्षेत्रातील भारतातील सर्वाधिक बाजारमूल्य असणारी कंपनी कोणती?**
**उत्तर : *ब.)*** जेएसडब्लू स्टील

**प्रश्न क्र. २. एफएमसीजी (फास्ट मुव्हिंग कन्झुमर गुड्स – जीवनावश्यक वस्तू) क्षेत्रातील भारतातील सर्वाधिक बाजारमूल्य कोणत्या कंपनीचे आहे?**
**उत्तर : *अ.)*** हिंदुस्थान युनीलिव्हर

**प्रश्न क्र. ३. भारतातील आतापर्यंतचा सर्वांत मोठ्या रकमेचा आयपीओ कोणता?**
**उत्तर : *ड.)*** वन ९७ कम्युनिकेशन्स लिमिटेड (पेटीएम)

**अर्थसाक्षर स्पर्धा ६च्या प्रश्नांना एकाही स्पर्धकाने बरोबर उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अर्थसाक्षर स्पर्धा ६साठी एकही विजेता नाही.**

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ७

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. क्रिप्टो करन्सी तयार करताना कोणत्या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो?**
***अ.)*** ब्लॉकचेन ***ब.)*** मेटा ***क.)*** गुगल ***ड.)*** फाईव जी

**२. भारतात टपाल कार्यालयांची एकूण संख्या किती आहे?**
***अ.)*** दोन लाख ***ब.)*** दीड लाख ***क.)*** एक लाख ***ड.)*** चार लाख

**३. अर्थसंकल्पात या प्रकारच्या ४०० रेल्वेगाड्या पुढील तीन वर्षांत सुरू करण्याची घोषणा करण्यात आली आहे.**
***अ.)*** राजधानी ***ब.)*** तेजस ***क.)*** हमसफर ***ड.)*** वंदे भारत




**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# पेणमधील सोनखार रस्त्याच्या कामाचे उद्घाटन

## आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रयत्नाने निधी मंजूर

**पेण : प्रतिनिधी**

आमदार रविशेठ पाटील यांच्या निधीतून आत्तापर्यंत पाच कोटींची विकासकामे पूर्ण झाली असून विकासकामांचा हा झंझावात यापुढेदेखील सुरू राहणार आहे, अशी ग्वाही रायगड जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते तथा भाजप नेते वैकुंठ पाटील यांनी शनिवारी (दि. ५) दिली.

आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रयत्नाने जिल्हा नियोजन मंडळाकडून मिळालेल्या निधीतून दादरफाटा ते सोनखार या तीन किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले. या कामाचे उद्घाटन वैकुंठ पाटील यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले. त्या वेळी झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. शहराप्रमाणेच ग्रामीण भागदेखील सुजलाम सुफलाम करण्याचे आमदार रविशेठ पाटील यांचे स्वप्न असून हे स्वप्न साकार होण्याच्या मार्गावर असल्याचा दावा त्यांनी या वेळी केला.

पेण तालुक्यातील विविध गावांमध्ये आमदार रविशेठ पाटील यांनी विकासकामांचा धुमधडका सुरू ठेवला असून, त्यांनी गेली अनेक वर्षे प्रलंबित असणाऱ्या सोनखार रस्त्याकडे विशेष लक्ष दिले. त्यांच्या प्रयत्नाने जिल्हा नियोजन मंडळाने दिलेल्या निधीतून तीन किलोमीटर लांबीच्या या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले असल्याचे वैकुंठ पाटील यांनी या वेळी सांगितले.

ग्रामपंचायत सदस्य विश्वनाथ म्हात्रे, रेश्मा म्हात्रे, परमेश पाटील, मिलिंद म्हात्रे, सुर्यहास पाटील यांच्यासह ग्रामस्थ या कार्यक्रमाला उपस्थित होते. पेण तालुक्यातील दादरफाटा ते सोनखार या रस्त्याचे बऱ्याच वर्षानंतर काम झाल्याने परिसरातील ग्रामस्थ सुखावले आहेत.



(छाया : अनिस मनियार)

## नगराध्यक्ष पदासाठी पालीमध्ये शिवसेना, राष्ट्रवादी आमनेसामने

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील पाली नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदासाठी गीता पालरेचा (राष्ट्रवादी) आणि सचिन जवके (शिवसेना) यांचे उमेदवारी अर्ज दाखल झाले असल्याची माहिती पिठासन अधिकारी तथा रोहा प्रांताधिकारी डॉ. यशवंत माने यांनी दिली.

पाली नगरपंचायतीची पहिली सार्वत्रिक निवडणूक नुकतीच झाली असून नगराध्यक्ष पदासाठी गुरुवारी (दि. १०) निवडणूक होणार आहे. राष्ट्रवादीच्या गीता पालरेचा आणि शिवसेनेचे सचिन जवके यांनी नगराध्यक्ष पदासाठी आपले उमेदवारी अर्ज डॉ. यशवंत माने यांच्याकडे सादर केले. या वेळी नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंखे, निवासी नायब तहसीलदार दत्तात्रेय कोष्टी उपस्थित होते. या अर्जाची छाननी लागलीच करण्यात आली आहे.

नगराध्यक्ष पदाच्या निवडीनंतर १५ मिनिटांनी उपनगराध्यक्ष पदाचे अर्ज स्वीकारले जातील. दुपारी २ नंतर अर्जाची छाननी होऊन पुढील कार्यवाही केली जाईल असे पिठासन अधिकारी डॉ. यशवंत माने यांनी सांगितले.

## कर्जत ताडवाडी येथे आदिवासी महिलांना मारहाण

### नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील ताडवाडी येथील जमिनी (सर्वे नंबर३३/२) मध्ये शुक्रवारी (दि. ४) जेसीबीच्या सहाय्याने खोदकाम सुरू होते. त्याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या दोन आदिवासी महिलांना तेथील तरूणांनी जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केली. या प्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

कर्जत तालुक्यातील ताडवाडी येथील तुळसाबाई खंडवी या आदिवासी शेतकऱ्याची जमीन (सर्वे नंबर३३/२) असून ती त्यांनी कोणत्याही व्यक्तीला किंवा बिगर आदिवासी शेतकऱ्याला विकलेली नाही. मात्र सदर जमिनीच्या सातबारा उताऱ्यावरील त्यांचे नाव गायब झाले आहे. त्याबद्दल त्यांनी महसूल विभागाकडे अर्जदेखील केला आहे. या जमिनीमध्ये काही लोकांकडून खोदकाम आणि सपाटीकरणाचे काम सुरु आहे. त्याबद्दल शेतकरी खंडवी यांनी तीन दिवसांपुर्वी नेरळ पोलीस ठाण्यात आपले म्हणणे मांडले होते. त्यावेळी पोलिसांनी जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तींना समज देण्याचे आश्वासन दिले होते.

ताडवाडी येथील जमिनीमध्ये शुक्रवारी (दि. ४) एक्झर्बीया कंपनीचे दोन जेसीबी खोदकाम करीत होते, त्यावेळी जमिनीच्या मालक तुळसाबाई खंडवी यांनी जेसीबी चालकाला सदरची जागा आमची आहे, असे सांगून काम बंद करण्यास सांगितले. त्यावेळी तेथे असलेल्या पाच अनोळखी तरुणांनी तुळसाबाई खंडवी आणि रंजना प्रकाश खंडवी यांना हाताबुक्यांनी मारहाण व जातीवाचक शिवीगाळी करुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली. या वेळी मोरेवाडी, ताडवाडी येथील विमल ठोंबरे, रंजना ठोंबरे, विमल खंडवी, सपना खंडवी, रामू खंडवी यांनी मारहाण थांबवली. या प्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे करीत आहेत.

## पॉलिश करण्याच्या बहाण्याने दागिने केले लंपास

**धाटाव : प्रतिनिधी**

सोन्याचे दागिने पॉलिश करून देतो असे सांगून दोन अनोळखी इसमांनी दागिने घेऊन पोबारा केल्याची घटना रोहा अंधारआळीतील भवानी प्लाझामध्ये घडली.

रोहा शहरातील राम मारुती चौक ते मेहेंदळे हायस्कूल मार्गावर अंधारआळी येथील भवानी प्लाझा या इमारतीत दोन अनोळखी इसमांनी, 'आम्ही उजाला कंपनीची जाहिरात करण्यासाठी आलो आहोत. घरातील तांब्या पितळेची भांडी, सोन्या-चांदीचे दागिने पॉलिश करून देतो', असे सांगून तेथे राहणाऱ्या महिलेकडून घरातील सोन्याचे दागिने पॉलिश करण्यास घेतले. त्यात सोन्याचे मंगळसूत्र व कानातील टॉप अशा एकूण ५९ हजार रुपये किमतीचे दागिन्यांचा समावेश होता. हे दागिने हळद टाकलेल्या गरम पाण्यात दहा ते पंधरा मिनिटे ठेवल्यास स्वच्छ होतील, असे सांगत त्या दोघांनी हातचलाखीने दागिने लंपास केले व पोबारा केला.

आपली फसवणूक झाली आहे, याचा अंदाज येताच सदर महिलेने रोहा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पुढील तपास सुरू आहे.

## मुरूड ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांची वानवा

**मुरूड : प्रतिनिधी**

येथील ग्रामीण रुग्णालयात गेल्या तीन वर्षांपासून कायम स्वरुपी वैद्यकीय अधीक्षक नियुक्त न केल्यामुळे रुग्णसेवेत अनियमिता दिसून येत आहे. मुरूड ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षकांची तातडीने नियुक्ती करून रुग्णांना दिलासा द्यावा, अशी मागणी स्थानिक नागरिक करीत आहेत.



(छाया : संजय करडे)

मुरूड ग्रामीण रुग्णालयात सध्या डॉ. विजय हाडबे हे एकमेव वैद्यकिय अधिकारी नियुक्त असून डॉ. दिव्या सोनम व डॉ. शिवानी यांचा ११ महिन्यांचा करार संपुष्टात आल्यामुळे त्यांना सेवेतून मुक्त करण्यात आले आहे. डॉ. शिवानी या ३० डिसेंबर २०२१ तर डॉ. सोनम यांचा कार्यकाळ १५ जानेवारी २०२२ रोजी संपुष्टात आला आहे.

या ग्रामीण रुग्णालयात एमबीबीएस डॉक्टर्स कंत्राटी पद्धतीने नेमण्यात येतात. मात्र पूर्णवेळ वैद्यकीय अधीक्षक कायम स्वरूपी नियुक्त न केल्याने अलिबाग जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. पडोळे यांच्याकडे मुरूड ग्रामीण रुग्णालयाचा वैद्यकीय अधीक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार आहे. डॉ. बागुल यांच्या निवृत्तीनंतर गेल्या तीन वर्षांपासून मुरूड ग्रामीण रुग्णालयात एमडी किंवा एमएस अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आलेली नाही.

कोविडच्या पार्श्वभूमीवर १५ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलांचे लसीकरण सध्या सुरू असून ज्येष्ठ नागरिकांसाठी बुस्टर डोस मोहीम कार्यान्वित करण्यात आली आहे. या ग्रामीण रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागात रोज सरासरी १०० ते १२० रुग्णांची तपासणी व औषध योजना होत असते. लसीकरण व बाह्यरुग्ण (ओपीडी) विभाग सांभाळतांना सध्या डॉ. विजय हाडबे यांची कसरत सुरु आहे.

तज्ज्ञ डॉक्टर्स नसल्याने येथील रुग्णांना अलिबाग, रोहा अथवा पुणे, मुंबईत वैद्यकीय उपचारासाठी धाव घ्यावी लागत आहे. गोरगरीबांना हा खर्च परवडत नसल्याने सर्वसामान्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.दोन डॉक्टर्सचा कंत्राट कालावधी संपुष्टात आल्याने नविन नियुक्ती केली जावी. तसेच रुग्णालयात निष्णात सर्जन, भूलतज्ज्ञदेखील २४ तास उपलब्ध होणे गरजेचे आहे. त्याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

दरम्यान, अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात डॉक्टरांची संख्या पुरेशी असल्यास प्रतिनियुक्तीवर दोन-दोन डॉक्टर्स रोटेशन पद्धतीने मुरूड ग्रामीण रुग्णालयात पाठविले तरी लसीकरण कामास वेग येईल. या शिवाय बाह्यरुग्ण विभागात येणाऱ्या रुग्णांना दिलासा मिळेल, असे स्थानिक नागरिकांचे मत आहे. या संदर्भात अधिक माहिती घेण्यासाठी वैद्यकिय अधीक्षक डॉ. पाडोळे यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

**लसीकरण व बाह्य रुग्ण विभाग या दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळतांना कसरत करावी लागते. रिक्त जागांविषयी तसेच कर्मचारी उपलब्ध व्हावेत यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.**

**-डॉ. विजय हाडबे, वैद्यकिय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, मुरूड**

## मोरे महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनींची रोहा एमआयडीसीला क्षेत्रभेट

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील धाटाव येथील एम. बी. मोरे महिला महाविद्यालयातील विज्ञान शाखेच्या तृतीय वर्ष वर्गातील विद्यार्थिनींची रोहा एमआयडीसीमधील बेक केमिकल्स येथे ४ आणि ५ फेब्रुवारी रोजी शैक्षणिक क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली होती.

या विद्यार्थिनींना 'पाणी शुद्धीकरण प्रक्रिया' या सर्टिफिकेट कोर्स अंतर्गत क्षेत्रभेटीमध्ये प्रत्यक्ष कंपनीच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाची माहिती देण्यात आली. बेक केमिकल्सचे प्लांटचे प्रमुख संतोष अधिकारी आणि कर्मचारी अमित पाटील, किरण मोरे यांनी प्लांटच्या कामासंबंधी प्रात्यक्षिक दिले आणि प्लांटवरील केल्या जाणाऱ्या दैनंदिन नोंदीची माहिती दिली.

महाविद्यालयाच्या ३५ विद्यार्थिनींसह प्रा. प्रतीक्षा घारगे, प्रा. निकिता महाडिक, प्रा. प्रतिमा भोईर आणि प्रा. ममता बिंद यांनी क्षेत्रभेटीत सहभाग घेतला होता. प्राचार्य प्रसन्न म्हसळकर आणि सर्टिफिकेट कोर्स कमिटीच्या प्रमुख प्रा. प्रतीक्षा घारगे यांनी या क्षेत्रभेटीचे नियोजन केले होते.




(छाया : महादेव सरसंबे)

## कर्जतच्या अश्विनी बोरसे यांच्या चित्रांचे मुंबईतील 'जहांगीर' मध्ये प्रदर्शन





**कर्जत : बातमीदार**

येथील अश्विनी बोरसे यांच्या 'अज्ञात' या चित्रांचे प्रदर्शन ७ ते १३ फेब्रुवारी २०२२ या कालावधीत मुंबईतील जहांगीर कला दालनामध्ये भरविण्यात येणार आहे. अश्विनी यांनी क्रीलिक रंगांमध्ये कॅनव्हासवर साकारलेली बावीस चित्रे या प्रदर्शनात मांडण्यात येणार आहेत.



अश्विनी या आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार पराग बोरसे यांच्या पत्नी आहेत. 'द बॉम्बे आर्ट सोसायटी' या संस्थेने सलग तीन वर्ष त्यांच्या वार्षिक प्रदर्शनासाठी अश्विनी यांच्या चित्रांची निवड केली होती. तसेच कोहिनूर कॉंटिनेंटल गॅलरी, ओबेराय ट्रायडंट गॅलरी, द लीला आर्ट गॅलरी या प्रसिद्ध कला दालनांमध्येसुद्धा अश्विनीच्या चित्रांची प्रदर्शने भरली आहेत.

प्रदर्शनात मांडण्यात येणारी सर्व चित्रे अश्विनी बोरसे यांच्या अज्ञात या संकल्पनेवर आधारित आहेत. कोणत्याही रंग आणि आकरांना ज्ञात करून पाहण्यापेक्षा अज्ञात स्वरूपाने पाहता येण्याची क्षमता हीच खऱ्या अर्थाने मनुष्याला सौंदर्य आणि कुतूहलाची खरी अनुभूती करून देऊ शकते, असा या मागचा अश्विनी यांचा विचार आहे.

## नेहमी सत्याची कास धरावी -सदाशिव देशमुख

### कर्जतमध्ये गुणवंत विद्यार्थी, निवृत्त सैनिक, ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार

**कर्जत : प्रतिनिधी**

मी देशासाठी माझे आयुष्य व्यतीत केले. खोटे बोलण्याची वेळ माझ्यावर कधीच आली नाही. नेहमीच सत्याची कास धरली. आपणही काही झाले तरी सत्य सोडू नये, म्हणजे जीवन सुकर होईल, असे प्रतिपादन ज्येष्ठ निवृत्त सैनिक सदाशिव देशमुख यांनी शुक्रवारी (दि. ४) येथे केले.

माघी गणेश जयंतीचे औचित्य साधून श्री सिद्धिविनायक सेवा मंडळाच्या वतीने विद्यार्थी गुणगौरव, निवृत्त सैनिकांचा सन्मान व ज्येष्ठ नागरिकांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी निवृत्त सैनिक सदाशिव देशमुख बोलत होते. देश रक्षणासाठी जास्तीत जास्त युवकांनी भारतीय सैन्य दलात भरती व्हावे, असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

मंडळाचे अध्यक्ष सदाशिव बैलमारे यांनी स्वागत केले. वसंत मोधळे यांनी प्रास्ताविकात मंडळाच्या कार्याचा आढावा सादर केला. नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, जीएसटी आयकर विभागाचे निवृत्त उपायुक्त जयदीप भिवंडकर, विजय मांडे यांनी मनोगत व्यक्त केले. यानंतर १० वी १२ परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार, तसेच परिसरातील विनायक उपाध्ये, दगडू धुळे, भगवान शिंदे, रमेश हुलगे, अनिल थोरवे, प्रमोद लोभी, शरदकुमार साळवी, अमोघसिद्ध रायबन या निवृत्त सैनिकांचा सन्मान करण्यात आला. गोविंद दिघे, गोपाळ बैलमारे, दामू मोरे, रामचंद्र हरपुडे, बाळकृष्ण चंदने, एकनाथ कदम, दीनानाथ वैद्य, दामू बैलमारे, हरिश्चंद घाडगे, रामदास सगणे या ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. भगवान शिंदे आणि हरिश्चंद्र घाडगे यांनी सत्काराला उत्तर दिले.

विजय कोंडीलकर यांनी सूत्रसंचालन केले. नगरसेविका भारती पालकर, संचिता पाटील तसेच मारुती बैलमारे, महेश जाधव, मनोहर ठाकरे, आण्णा बैलमारे, माजी नगरसेवक संतोष पाटील, कृष्णा घाडगे, वैशाली पाटील, संदीप पाटील आदींसह नागरिक या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




(छाया : विजय मांडे)


## जाहीर नोटीस
### (मालकी हक्काच्या शोधासाठी)

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशील गणपत हाशा म्हात्रे व दत्तात्रेय हाशा म्हात्रे दोघेही रा. खांदा गाव, ता. पनवेल यांची मौजे-पनवेल, ता. पनवेल येथे खालील वर्णनाची जमीन मिळकत आहे. सदरची जमीन ते अशोक शिवाजी वायदंडे व सौ. संध्या अशोक वायदंडे रा. कळंबोली, ता. पनवेल ह्यांना विकत देण्याचा ठराव करीत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**

| मौजे | भोगवट धारकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर पॉ. |
|---|---|---|---|---|
| पनवेल | गणपत हाशा म्हात्रे<br>दत्तात्रेय हाशा म्हात्रे | ५०७ | ३ अ | ०-०६-१०<br>पो.ख. ०-००-२० |
| पनवेल | गणपत हाशा म्हात्रे<br>दत्तात्रेय हाशा म्हात्रे | ५०७ | ३ ब | ०-१०-००<br>पो.ख. ०-००-३० |

सदरची जमीन आमचे अशिलांच्या मालकीची व ताबेकब्जा वहिवाटीची असून सदर जमिनीशी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. तरीही मालकी हक्काच्या शोधासाठी आमचे अशिलांची आमची नेमणूक केलेली असून सदर जमिनीच्या मालकी हक्काचा शोध घ्या, असे आम्हास कळविलेले आहे. सबब मालकी हक्काच्या शोधासाठी सदरची जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

ह्या नोटीसीने तमाम जनतेस असे कळविण्यात येते की, सदर जमिनीसंबंधी कोणाही इसमाची कोणत्याही प्रकारची हरकत, ताबाकब्जा, वहिवाट, वारसाहक्क, गहाण, बयाणापावती, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, दावा, अपील, हुकूमनामा, दरखास्त, जमिनीचे भूसंपादन, दान, दत्तक, बक्षीस असा कोणत्याही प्रकारचा हक्क किंवा अधिकार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत त्यांनी आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास आम्ही आमच्या अशिलांना त्यांच्या जमिनीच्या मालकी हक्क स्वच्छ, कायदेशीर व विक्री करण्याजोगा आहे असा दाखला (TITLE CERTIFICATE) त्यांना जारी करु, उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर व आमच्यावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे फक्त जमिनीच्या मालकी हक्काच्या शोधासाठी ही नोटीस प्रसिद्ध केली.

ता. ६/२/२०२२
पनवेल

सही/-
**ॲड. वाय. एस. भोपी**
**पत्ता :- शॉप नं. १३५, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळ्यापुढे पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मोबाईल नं. ९८२०२७३६९१**

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, आमचे अशिलांची मालकीची तळोजे मजकुर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत जिचे विद्यमान मालक यांचेकडून विकासन करण्याचे ठरविले आहे.

सदर मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे

| मौजे | भूमापन क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| तळोजे मजकुर तालुका पनवेल | ५/१/ब/१ | एकूण क्षेत्र ०-६०-१० | ७.९५ |
| | ७/२/अ/२/ब | एकूण क्षेत्र १-०८-१० | १९.७५ |
| | १०/६ | एकूण क्षेत्र ०-३८-०० | ८.१३ |
| | ६/१ ब | एकूण क्षेत्र ०-४१-४० | ६.१३ |
| | ५/१ अ | एकूण क्षेत्र ०-१५-५० | २.१८ |
| | ७/५ | एकूण क्षेत्र ०-१८-०० | ३.१९ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या विकासन कराराचे व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येऊन आमचे अशिल वरील मिळकतीच्या कायम खरेदीचे व्यवहार पूर्ण करतील, मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**दिनांक : ०५/०२/२०२२**

सही/-
**ॲड. कांचन एस. पाटील**
**पत्ता : १३३७ बी, रुम नं. २, शिवाजी पाटील निवास, प्रभूआळी, जुने पनवेल, जि. रायगड ४१०२०६.**
**फोन : ८६८९८०९८९६, ८१०८८८२६११**

# आज भारत विरुद्ध वेस्ट इंडिज वनडे सिरीज

**'मुंबई इंडियन्स'ची जोडी करणार टीम इंडियासाठी ओपनिंग**

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

भारत विरूद्ध वेस्ट इंडिजच्या वनडे सिरीजला रविवार (दि. ६)पासून सुरुवात होणार आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर सिरीजमधील पहिला सामना खेळवला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर रोहित शर्माने शनिवारी वन डे संघाचा पूर्णवेळ कर्णधार म्हणून प्रथमच पत्रकार परिषद घेतली. या वेळी त्याने काही महत्त्वाच्या विषयांवर भाष्य केले. मुंबई इंडियन्सचा स्टार फलंदाज इशान किशन हा वेस्ट इंडिजविरूद्ध पहिल्या वन डे सामन्यात भारतासाठी डावाची सुरुवात करेल असे रोहित शर्माने स्पष्टपणे सांगितले.

वेस्ट इंडिजविरुद्धच्या वन डे मालिकेसाठी रोहित शर्मा कर्णधार आणि फलंदाज म्हणून संघात परतला.



पण मालिकेच्या काही दिवस आधी भारतीय संघाला कोविडचा फटका बसला. ऋतुराज गायकवाड, शिखर धवन, श्रेयस अय्यर आणि नेट बॉलर नवदीप सैनी यांना वन डे मालिकेला मुकावे लागणार आहे. तसेच, बहिणीच्या लग्नामुळे केएल राहुलही पहिल्या वन डे साठी उपलब्ध नाही. त्यामुळे भारतीय संघात इशान किशनला दाखल करून घेण्यात आले असून तोच उद्याच्या सामन्यात ओपनिंग करणार आहे, असे रोहितने स्पष्ट केले.

डावखुऱ्या इशान किशनला वेस्ट इंडिजविरूद्धच्या टी२० मालिकेत संघात घेण्यात आले होते, पण वन डे मध्ये सलामीवीर म्हणून पहिल्या पसंतीचे अनेक खेळाडू अनुपलब्ध झाल्याने किशनला अंतिम संघात स्थान मिळण्याची शक्यता अधिक आहे. इशान किशनने गेल्या वर्षी वन डे क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. पहिल्यावहिल्या चेंडूवर जबरदस्त षटकार ठोकून त्याने साऱ्यांनाच थक्क केले होते. त्याच सामन्यात त्याने वन डे पदार्पणात सर्वांत जलद अर्धशतक करण्याचा विक्रमही नोंदवला होता. आता वेस्ट इंडिजविरूद्धच्या मालि-केत तो काय कमाल करतो याकडे चाहत्यांचे लक्ष आहे.

दरम्यान, इशाननेच रोहितसोबत ओपनिंग करावी असे माजी क्रिकेटर सबा करीम म्हणाले होते. तुमच्याकडे पर्याय उरलेले नाहीत. काही खेळा-डूंना कोरोना झालाय त्यामुळे तुमचा संघ थोडासा खचू शकतो. त्यामुळे मला वाटे की या साऱ्या घडामोडींकडे वेगळ्या दृष्टीकोनातून बघा. जर इशान किशनने रोहित शर्मासोबत सलामी दिली, तर ते नक्कीच फायद्याचे होईल. इशान किशन हा स्ट्राइक रेटच्या बाबतीत नेहमीच पुढे असतो. अशा वेळी रोहित सेट व्हायला वेळ घेत असताना इशान पॉवर-प्लेचा योग्य फायदा संघाला मिळवून देऊ शकतो.

## श्रुती भोसलेची आशियाई क्रीडा स्पर्धेत संभाव्य स्केटर म्हणून निवड

**नवी मुंबई : बातमीदार**



नेरुळ येथील १७ वर्षीय श्रुती भोसले हिची १९ व्या आशियाई क्रीडा स्पर्धेकरिता संभाव्य स्केटर (स्केटिंग खेळाडू) म्हणून भारतीय रोलर स्केटिंग महासंघाकडून निवड करण्यात आली आहे.

मोहाली येथे ११ ते २२ डिसेंबर २०२१ या कालावधीत पार पडलेल्या राष्ट्रीय स्केट बोर्डिंग स्पर्धेमध्ये उत्तम कामगिरी करून श्रुतीने सुवर्णपदक पटकावले होते. पंजाबमधील मोहाली येथे ११ ते २२ डिसेंबर २०२१ या कालावधीत पार पाडलेल्या राष्ट्रीय रोलर स्केटिंग स्पर्धमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या श्रुती भोसले हिने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदकाची कमाई केली.

दरम्यान, चीनमध्ये १० ते २५ सप्टेंबर २०२२ या कालावधीत १९ व्या आशियाई स्पर्धेकरिता संभाव्य स्केटर म्हणून श्रुती व्यतिरिक्त महाराष्ट्रातील उर्मिला पाबळे, तमिळनाडूतील कमाली आणि दिल्ली येथील आध्या यांचीही निवड करण्यात आली आहे.

## 'रायगड रॉयल्स'च्या अथर्व खांडेकरचे शतक

### आज अंतिम लढत

**अलिबाग : प्रतिनिधी**

झुंझार युवक मंडळ पोयनाड आयोजित १४ वर्षांखालील मुलांसाठीच्या एकदिवसीय ४० षटकांच्या क्रिकेट स्पर्धेतील साखळी सामन्यात रायगड रॉयल्स संघाचा अष्टपैलू खेळाडू अथर्व खांडेकर याने रायझिंग स्टार खोपोली संघाविरुद्ध खेळताना स्पर्धेतील सहावे शतक आपल्या नावावर केले. त्याने ८२ चेंडूंत २१ चौकारांनिशी १२४ धावांची खेळी केली.



अथर्वच्या शतकाच्या जोरावर 'रायगड रॉयल्स'ने हा सामना ११६ धावांनी एकतर्फी जिंकला. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सहसचिव अनिल गद्रे, रायगड प्रीमियर लीगचे अध्यक्ष राजेश पाटील, जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे कार्याध्यक्ष जयंत नाईक, झुंझार युवक मंडळाचे अध्यक्ष अन्वर बुराण, सचिव किशोर तावडे, खजिनदार दीपक साळवी, सदस्य अजय टेमकर, नंदकिशोर चवरकर, स्पर्धा समितीचे प्रमुख सुजित साळवी, इम्रान बुराण, ॲड. पंकज पंडित यांनी अथर्वचे अभिनंदन केले.

अंतिम सामना भेंडखळ क्रिकेट अकॅडमी उरण विरुद्ध पनवेल क्रिकेट स्पोर्ट्स अकॅडमी पनवेल या संघांमध्ये रविवारी (दि. ६) पोयनाड येथे होणार आहे.


















पनवेल : माघी गणेशोत्सवानिमित्त भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी धानसर, वलप, वळवली, शेलघर, नवीन पनवेल, खांदा गाव, धुतूम या ठिकाणी जाऊन गणरायाचे दर्शन घेतले. सोबत भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, नगरसेवक मनोहर म्हात्रे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते होते.







पनवेल : माघी गणेशोत्सवानिमित्त शुक्रवारी महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पनवेल, नवीन पनवेल, तक्का व पोदी याठिकाणी जाऊन गणपतीचे दर्शन घेतले. या वेळी प्रभाग समिती 'ड'च्या सभापती ॲड. वृषाली वाघमारे, नगरसेवक नितीन पाटील, अनिल भगत, ॲड. मनोज भुजबळ, मनोहर म्हात्रे, अजय बहिरा, नगरसेविका सुशीला घरत, राजश्री वावेकर, माजी नगरसेवक सुभाष भुजबळ, जगदीश घरत, प्रतीक बहिरा, राकेश भुजबळ, जितेंद्र वाघमारे सोबत होते.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com